# परीक्षेनंतरच पदवी योग्य...





डॉ. बी. एम. हिर्डेकर

**राज्यातील विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासंदर्भात आणि दुसऱ्या बाजूने त्या होऊ नयेत म्हणून चाललेले वाद प्रतिवाद कोणत्याच ठोस आणि समस्येवर सुयोग्य तोडगा काढण्याच्या दिशेने नक्कीच चाललेले नाहीत, खरं तर हा खटाटोप करण्याची गरज नव्हती. आता तर या संबंधीची प्रकरणे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात पोहोचली आहेत. मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, राज्यपाल, राजभवन, युजीसी आणि आता न्यायालयाने या पंचकोनी पेचात  हा प्रश्न अडकला आहे. एखादी गोष्ट सूत्रबद्ध पद्धतीने शिस्तीने सोडवता येत असेल तर ती अधिक गुंतागुंतीची करण्याकडे शहाण्या माणसांचा कल असतो. असाच प्रकार परीक्षा प्रकरणावरून होत आहे.**

'कोविड'ची अभूतपूर्व परिस्थिती मान्य. विद्यार्थ्यांचे जीवित महत्त्वाचे हेही मान्य. पण विद्यार्थी आणि पालक गेली पाच महिने हवालदिल असताना केंद्रसरकार मोठे की राज्य सरकार, राज्यपाल की मुख्यमंत्री, या अहंकाराच्या खेळात विद्यार्थी मात्र निराशेच्या खोल गर्तेत चालले आहेत. दूरगामी परिणाम करणारे व लाखो विद्यार्थ्यांशी संबंधित निर्णय घेताना गांभीर्य हवे. हाताशी असलेल्या योग्य स्त्रोतातून आलेली अधिकृत माहिती आणि त्याच्या विश्लेषणावर आधारीत निर्णय घ्यावा लागतो.

महामारीच्या कायद्याअंतर्गत, राज्यशासनाला व स्थानिक प्रशासनाला काही निश्चित अधिकार प्राप्त होतात. पण हा कायदाही ब्रिटिशकालीनच आहे. पण म्हणून त्या त्या संबंधित खात्याच्या नियमांना परिनियमांना, कायद्यांना पूर्णत: तिलांजली देऊन Pandemic Act Supersacles all acts and laws असा अर्थ काढून संबंधितांना जनतेला गृहित धरुन आदेश काढणे अपरिपक्वतेचे, अविचारी आणि जुलमी वृत्तीचे वाटते. म्हणूनच 'महाराष्ट्र विद्यापीठ कायदा' आणि त्यातील तरतुदी लक्षात घ्यायलाच हव्यात. या कायद्यात कलम ५ मध्ये विद्यापीठाच्या 'पॉवर्स अँड ड्युटीज' आहेत. यामधील उपकलम (२१) मध्ये परीक्षा आणि पदवी प्रदान याबाबतचे अधिकार आहेत. उपकलमातील दुसरे उपउपकलम (ए) आणि (बी) मध्ये नेमून दिलेल्या अधिकार मंडळांनी (अॅकॅडेमिक कौन्सिल) ने दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर परीक्षा पास झाल्यानंतर त्यामध्ये ठरवून दिलेले गुण किंवा आवश्यक क्रेडिट्स मिळाल्यानंतरच पदवी देता येते हे सुस्पष्ट लिहिले आहे. हा अधिकार वापरत असताना यासाठी नेमलेले अधिकारी, 'संचालक परीक्षा आणि मूल्यमापन मंडळ'' यांना मार्गदर्शन करून त्यांच्या जबाबदारीनुसार कायदा कलम १७ मधील उपकलम (५) (ए) नुसार त्यांनी परीक्षा घ्यावयाच्या आहेत. शिवाय कायदा कलम ४८ नुसार नेमलेले 'परीक्षा मंडळ'' आणि त्यांच्या जबाबदाऱ्या ४८ (१) मध्ये दिलेल्या सर्व कलमानुसार संचालकांनी या मंडळाने ठरवून दिलेल्या मान्य केलेल्या बाबीनुसार परीक्षा पार पाडावयाच्या आहेत. विशेष म्हणजे या मंडळाचे अध्यक्ष कुलगुरूच असतात.या कायद्यातील तरतुदीनुसार शिक्षणमंत्री, मुख्यमंत्री यांना हस्तक्षेप करण्याची कोणतीच तरतूद नाही.

सध्या 'कोविड १९' च्या पार्श्वभूमीवर शासनाला काही अधिकार जरुर प्राप्त होतात. पण ते वापरताना नेमून दिलेल्या यंत्रणा त्यांचे कायदे कानून हे माहीत करुन घ्यायला हवे. संबंधित घटक म्हणजे प्राध्यापक, प्राचार्य, विद्यार्थी, कुलगुरु, विद्यापीठाची अधिकार मंडळे यांच्या भूमिका समजावून घेऊन तारतम्याने हा निर्णय घ्यावयास हवा होता. यामध्ये युजीसी आणि राजभवन, राज्यपाल यांची भूमिका महत्वाची आहे. कायदा कलम ९ (१) नुसार राज्यपाल राज्याचे प्रमुख आणि कुलपती म्हणून सर्व विद्यापीठांचे प्रमुख असताना त्यांनाही विश्वासात न घेता शेवटच्या वर्षाच्या परीक्षा रद्द करणे ही गोष्ट विद्यापीठ कायद्यातील अनेक कलमांचे उल्लंघन करणारी आहे.

### दूरगामी परिणाम

परीक्षा न घेता पदवी घेण्याचे दूरगामी परिणाम आहेत. शेवटच्या वर्षाच्या परीक्षेत व्यावसायिक अभ्यासक्रम आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा आहेत. व्यावसायिकांमध्ये कायदा, फार्मसी, आर्किटेक्चर, एमबीए, अभियांत्रिकी यांच्या परीक्षा आहेत. कायद्याच्या अभ्यासक्रमाबाबतीत बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करावी लागते. पदवी घेतल्यानंतर बार कौन्सिलकडे प्रॅक्टिस करण्यासाठी परवाना घ्यावा लागतो. हीच बाब फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची परवानगी, वेगळे रजिस्ट्रेशन करावे लागते. याचप्रमाणे कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरचा परवाना आर्किटेक्चरच्या विद्यार्थ्यांना आवश्यक असतो. यातील कायदा सोडून इतर अभ्यासक्रमांवर एआयसीटीईचे नियंत्रण असते. व्यावसायिक पदवीधरांना पुढे नोकरी किंवा स्वत:चा व्यवसाय करायचा झाल्यास जे परवाने/रजिस्ट्रेशन लागते ते पदवी परीक्षेच्या मार्कलिस्ट, पदवी वा अन्य कागदपत्रांची सखोल छाननी करूनच होते. अशावेळी सर्व देशातले वेगवेगळे चित्र समोर आल्यास विद्यार्थ्यांना पदवी हातात असून हात हलवत बसावे लागेल. याबरोबरच इतर बीए, बी. कॉम, बी एस्सी याही परीक्षा महत्वाच्या आहेत. पदव्युत्तर शिक्षणासाठी, देशपातळीवर सर्व विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेताना किमान गुण, किमान क्रेडिट, अथवा श्रेणी आवश्यक असतात. एमपीएससी, युपीएससी आणि इतर परीक्षांसाठी प्रवेश पात्रता ठरविताना मार्क्स् आणि पदवी यांचा विचार होतो. नोकरीत कागदपत्रांची छाननी होते. तेव्हा संधी जाण्याची शक्यता असते. पदव्युत्तर पदवी घेतल्यानंतर नेट-सेट परीक्षा संशोधनासाठीच्या परीक्षेत अडचणी उद्‌भवतात. उदा. आपल्या विद्यापीठाचे ५५ टक्के बी प्लस विद्यार्थी आणि ऑर्डिनन्स लागून ५५ टक्के बी असलेला विद्यार्थी भिन्न समजले जातात. ऑर्डिनन्स लागलेला बी प्लस ग्राह्य न मानता नेटला प्रवेश मिळत नाही.

### परीक्षा खरच घेता येतील काय?

कोणत्याही विद्यापीठात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त असते. ती काही प्रमाणात पिरॅमिड रुपात शेवटच्या वर्षी कमी होते. समजा आपण एका 'क्ष' विद्यापीठाची विद्यार्थी संख्या ७५००० (शेवटचे वर्ष) इतकी आहे. या विद्यापीठाची कॉलेजची संख्या २८० म्हणजेच प्रत्येक कॉलेजकडे २६७ विद्यार्थी येतील. प्रत्येक कॉलेजकडे किमान १००० विद्यार्थी संख्या गृहित धरली तर ५०० बेंच तरी असणार. २०० विद्यार्थी एकावेळी एका वर्गात फक्त ३० च्या संख्येने बसविले तर सात वर्गात बसतील. यामध्ये पुन्हा परीक्षा तीन सत्रात घेतली सकाळी ९ ते ११, १२ ते २ आणि ३ ते ५ तर अजूनही चांगले सोशल डिस्टन्सिंग पाळता येईल. आता पुन्हा दिनांक ६ जुलै २० रोजी युजीसीने सुधारित गाईडलाईन्स पाठविलेल्या आहेत. तज्ज्ञ समितीने फैलाव लक्षात घेऊन या गाईडलाईन्स तयार केल्या आहेत. परीक्षा ऑनलाईन, ऑफलाईन किंवा दोन्ही प्रकार वापरुन घ्याव्यात याचे स्वातंत्र्य विद्यापीठांना दिले आहे. परिस्थितीचा आढावा घेऊन जर परिस्थिती आटोक्यात आली असेल तर सप्टेंबर २०२० पर्यंत परीक्षा घेता येतील. गंभीर परिस्थितीत परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांचे जीवित धोक्यात घालावे असे कोणाचेही मत असणार नाही. पण परीक्षाच न घेता पदवी देऊन विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आणू नये असे तज्ज्ञांचे मत आहे. वरील सर्व परीक्षांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा ऑनलाईन होऊ शकतात. कला, वाणिज्य, शास्त्र शाखेतील विद्यार्थीसुद्धा किमान ५० टक्के तंत्रस्नेही असतील तर तेही ऑनलाईन परीक्षा देऊ शकतात. सोयी सुविधा नाहीत, इंटरनेट नाही हीही एक अव्यवहारी सबब असते. (गावोगावी एटीएम, मुलांचे, व्यापाऱ्यांचे मोबाईल चालतात. आर्थिक व्यवहार ऑनलाईन होतात.) काही कारणांमुळे ऑनलाईन परीक्षा होऊ शकली नाही तर उर्वरित मुलांची प्रत्यक्ष परीक्षा घेता येईल. पण परीक्षा घेऊनच पदव्या देणे सर्वार्थाने उचित ठरेल.

**डॉ. बी. एम. हिर्डेकर**
**(निवृत्त परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर)**